महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com फोन क्र. ०२४७२- २९७४४०

जा.क्र.शावैमधा/स्वी.स./राजशिष्टाचार समिती/ 1388 /२०२६ दि:- २७/०४/२०२६

**कार्यालयीन आदेश :-**

विषय- राजशिष्टाचार व शासकीय कार्यक्रमांकरीता समिती गठीत करणेबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे मा. मंत्री, खासदार, आमदार, इतर लोकप्रतिनिधी व शासनाचे वरीष्ठ अधिकारी, पदाधिकारी यांच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव आणि संलग्नित रुग्णालय येथे वेळोवेळी भेटी, पाहणी दौरे तसेच बैठका होत असतात. सदर बैठका, दौरे व इतर शासकीय कार्यक्रमांच्या नियोजनामध्ये सुसूत्रता येण्यासाठी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांना जबाबदारी सोपविणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने खालील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी सर्व शासकीय कार्यक्रम तथा दौरे, बैठका यांच्यासाठी आवश्यक असलेल्या संपूर्ण कामांचे नियोजन तथा सदरील कार्यक्रमामध्ये समन्वय साधण्याकरीता खालीलप्रमाणे राजशिष्टाचार समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव, पदनाम व विभाग | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. आशिष चेपुरे, प्राध्यापक व विभागप्रमुख, मनोविकृतीशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव | अध्यक्ष |
| २. | डॉ. ज्योती डावळे, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, स्त्री रोग आणि प्रसूतीशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव | सदस्य सचिव |
| ३. | डॉ. बालाजी भराटे, सहाय्यक प्राध्यापक आणि विभागप्रमुख, अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव | सदस्य |
| ४. | डॉ. सौरभ पाटील, सहाय्यक प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव | सदस्य |
| ५. | डॉ. अनुजा कंदले, सहाय्यक प्राध्यापक आणि विभागप्रमुख, नेत्ररोगचिकित्साशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव | सदस्य |
| ६. | डॉ. विवेक कोळगे, प्रशासकीय अधिकारी (महा.) तथा सहाय्यक प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग, शा.वै.म., धाराशिव. | सदस्य |
| ७. | डॉ. विशाल गिरी, निवासी वैद्यकीय अधिकारी, शा.वै.म. व रु., धाराशिव | सदस्य |
| ८. | श्री. देवानंद मोहाळे, प्रशासकीय अधिकारी (रुग्णा.) तथा वरिष्ठ सहाय्यक, शा.वै.म. व रु., धाराशिव. | सदस्य |

वरील समितीस आदेशित करण्यात येते की, या संस्थेअंतर्गत होणाऱ्या सर्व शासकीय कार्यक्रमांचे वेळेत नियोजन करुन त्याचा पूर्ण सराव करुन तसेच आवश्यकतेनुसार PPT सादरीकरण तयार करावे. तसेच समिती अध्यक्ष आणि सचिव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करावे व कार्यक्रमाच्या निश्चित वेळेआधी कार्यक्रमाची रुपरेषा व संक्षिप्त टिपणी अधिष्ठाता यांना सादर करावे.

डॉ. शैलेंद्र द. चौहान,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

प्रति :-

वरील सर्व संबंधितांस (मार्फत-विभागप्रमुख)

प्रत :-

१. उप-अधिष्ठाता (PG, UG आणि प्रशासकीय), शा.वै.म., धाराशिव.
२. सर्व विभागप्रमुख, शा.वै.म., धाराशिव.
३. वैद्यकीय अधीक्षक तथा अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक, शा.वै.म. व रु., धाराशिव.
४. मुख्य प्रशासकीय अधिकारी, शा.वै.म., धाराशिव.
५. उप-वैद्यकीय अधीक्षक, शा.वै.म. व रु., धाराशिव.

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव.